M16/MPS129/139/149/159/169/249/259/269/349/359/369/459/469/569/EE/20160528

वेळ : 3 तास **गुण : 80**

विद्यार्थ्यांसाठी सूचना :

1. या पेपरमध्ये पब्लिक सर्व्हिसेस्‌मध्ये पर्याय उपलब्ध असलेल्या एकूण 6 विषयांच्या प्रश्नपत्रिका छापलेल्या आहेत. प्रत्येक विद्यार्थ्याने यापैकी दोन वैकल्पिक विषयांच्या प्रश्नपत्रिका सोडवणे आवश्यक आहे.
2. या पेपरमधील प्रत्येक वैकल्पिक संयुक्त पेपर 40 गुणांचा आहे. दोन संयुक्त वैकल्पिक विषय मिळून हा पेपर एकूण 80 गुणांचा आहे.
3. प्रवेश अर्जामध्ये विद्यार्थ्याने जे वैकल्पिक विषय 1 व वैकल्पिक विषय 2 घेतलेले आहेत, तेच पेपर सोडवणे अनिवार्य आहे. दुसरे कोणतेही पेपर विद्यार्थ्याने सोडवू नयेत.
4. प्रत्येक वैकल्पिक विषय बहुपर्यायी प्रश्नांचा आहे. त्याची उत्तरे उत्तरपत्रिका / OMR Sheet वर नोंदवायची आहेत.
5. OMR Sheet वरील चार पर्यायांपैकी अचूक पर्यायाखालील वर्तुळ काळ्या पेनाने पूर्ण भरावे. वर्तुळ अर्धवट भरल्यास अथवा एका प्रश्नास जास्त वर्तुळ भरल्यास ते उत्तर चुकीचे समजले जाईल.



उत्तराची अयोग्य नोंद



उत्तराची योग्य नोंद

6. बहुपर्यायी प्रश्नांमध्ये सर्वात अचूक उत्तरे नोंदविणे अपेक्षित आहे.
7. प्रत्येक चुकीच्या उत्तरासाठी 1/3 उणे गुण पद्धत लागू आहे.

वैकल्पिक इतिहास (संयुक्त) (गुण : 40)

1. इ. स. पूर्व 6 व्या शतकात _____ महाजनपदे उदयास आली.
   a) 26 b) 16
   c) 28 d) 18

2. कपिल वस्तूचे साक्श, पावाचे मल्ल, कुशीनगरचे मल्लव इत्यादी उल्लेखनीय _____ होती.
   a) गणराज्ये b) जनपदे
   c) होळी राज्ये d) संघराज्ये

3. उत्तराध्यनसूत्र ग्रंथानुसार बिंबिसाराने _____ धर्माचा अंगीकार केला.
   a) बौद्ध b) जैन
   c) हिंदू d) इस्लाम

4. _____ च्या मे महिन्यात अलेक्झांडर भारताच्या सीमेवर येऊन धडकला.
   a) इ. स. पूर्व 310
   b) इ. स. पूर्व 317
   c) इ. स. पूर्व 327
   d) इ. स. पूर्व 340

5. इ. स. पूर्व 240 मध्ये _____ नगरीत सम्राट अशोकाने तिसरी बौद्ध धम्म परिषद आयोजित केली.
   a) गया
   b) राजगृह
   c) अलाहाबाद
   d) पाटलीपुत्र

6. _____ हा मौर्य साम्राज्याचा शेवटचा राजा ठरला.
   a) अजातशत्रू
   b) अशोक
   c) बृहद्रथ
   d) बिंबिसार

7. _____ कालखंडातील सातवहन, कुशाण, चोल, चेर या उल्लेखनीय सत्ता होत.
   a) मौर्य
   b) मौर्योत्तर
   c) गुप्त
   d) मध्ययुगीन

8. सिमूक हा _____ राजघराण्यातील पहिला राजा, तसेच संस्थापक म्हटला जातो.
   a) सातवहन
   b) कुशाण
   c) गुप्त
   d) विजयनगर

9. वाकाटक घराण्याची दुसरी शाखा वत्सगुल्माची राजधानी _____ होती.
   a) नागपूर
   b) वाशीम
   c) प्रतिष्ठान
   d) बदामी

10. पल्लव काळातील _____ येथील गणेशरथ प्रसिद्ध आहे.
    a) कांचीपुरम्
    b) मदुराई
    c) मच्छलीपट्टणम्
    d) संस्कृत

11. _____ संस्कृतीत संगम साहित्याचा कालखंड हा सर्वांत प्राचीन कालखंड समजला जातो.
    a) तेलुगू
    b) कन्नड
    c) तमिळ
    d) संस्कृत

12. राजेंद्र पहिला हा _____ राजघराण्याचा प्रसिद्ध राजा होता.
    a) चोळ
    b) विजयनगर
    c) चेर
    d) पल्लव

13. _____ कवीने समुद्रगुप्ताच्या दक्षिण दिग्विजयाचे विस्ताराने वर्णन केले आहे.
    a) बाणभट्ट
    b) दण्डी
    c) हरिषेण
    d) इत्सिंग

14. _____ या वर्धन सम्राटाने कनोज येथे धर्मपरिषद आयोजित केली.
    a) हर्षवर्धन
    b) राजवर्धन
    c) प्रभाकरवर्धन
    d) देवगुप्त

15. यादवनृपती रामचंद्रदेव यांच्या काळात _____ या दिल्ली सुलतानाने यादवांवर स्वारी केली.
    a) कुतुबुद्दीन ऐबक
    b) बल्बन
    c) जलालुद्दीन खिलजी
    d) अल्लाउद्दीन खिलजी

16. हर्षवर्धनाच्या काळात ____ हे सत्ता केंद्र बनले.
a) कनोज
b) पाटलीपुत्र
c) वैशाली
d) कुशीनगर

17. राजा हर्षवर्धनाच्या काळात ____ या चिनी प्रवाशाने भारतात वास्तव्य केले.
a) ह्युएनत्संग
b) फाहियान
c) इत्सिंग
d) मेगॅस्थिनिस

18. बौद्ध संघाच्या कार्यासाठी जी सभागृहे बांधली गेली त्यांना ____ म्हटले जाते.
a) विहार
b) चैत्य
c) संघाराम
d) स्तूप

19. ____ या शिल्पामध्ये पिवळसर ठिपके असलेला तांबूस रंगाचा वालुकाश्म पाषाण वापरलेला आहे.
a) मथुरा
b) गांधार
c) अमरावती
d) यापैकी नाही

20. प्रसिद्ध गणितज्ञ ____ यांनी सन 1150 मध्ये 'सिद्धांत शिरोमणी' हा मौलिक ग्रंथ लिहिला.
a) आर्यभट्ट
b) भास्कराचार्य
c) वराहमिहिर
d) हरिषेण

21. दिल्लीच्या सुलतानशाहीच्या स्थापनेपूर्वी हिंदुकुश पर्वतापासून ते चिनाब नदीपर्यंत अस्तित्वात असलेल्या राज्यास ____ असे म्हणत.
a) हिंदुशाही राज्य
b) मौर्य साम्राज्य
c) अफगाण राज्य
d) तुर्की राज्य

22. ____ या दिल्ली सुलतानाने दिल्ली हीच राजधानी (पहिल्यांदा) केली.
a) कुतुबुद्दीन ऐबक
b) इल्तमश
c) बल्बन
d) रझिया

23. राणीने कोणत्या हिंदी सुलतानाची तुलना ॲरिस्टॉटल बरोबर केलेली आहे.
a) अल्लाउद्दीन खिलजी
b) रझिया
c) बल्बन
d) महंमद बिन तुघलक

24. ____ या दिल्ली सुलतानाच्या 37 वर्षांच्या राजकीय कालखंडात एकही बंड झाले नाही.
a) महंमद बिन तुघलक
b) बल्बन
c) फिरोझ तुघलक
d) जलालुद्दीन खिलजी

25. बाबर आणि ____ यांच्यात 21 एप्रिल 1526 रोजी पानिपत येथे युद्ध झाले.
a) इब्राहिम लोदी
b) सिकंदर लोदी
c) अल्लाउद्दीन खिलजी
d) मुबारक खिलजी

26. ____ साली दक्षिणेत काही अमीरांनी मिळून दौलताबाद येथे बहामनी राज्याची स्थापना केली.
a) 1526
b) 1476
c) 1326
d) 1347

27. ____ येथील लढाईने विजयनगरचे राज्य संपुष्टात आले.
a) तालिकोट
b) मच्छलीपट्टणम्
c) कांचीपुरम्
d) प्रतिष्ठान

28. हुमायूनच्या मृत्यूनंतर त्याचा एकनिष्ठ सरदार ____ हा अकबराचा गूरू व पालक बनला.
a) बिरबल
b) अबुल फजल
c) बहराम खान
d) अमीर खुस्रो

29. 1615 मध्ये इंग्रजांचा वकील ____ याने जहांगीराकडून व्यापारी सवलती प्राप्त केल्या.
a) सर थॉमस रो
b) कॅप्टन हॉकिन्स
c) वेलस्ली
d) माऊंटबॅटन

30. हिंदी भाषेतील कवी ____ यांची शिवराज भूषण आणि शिवबावनी प्रसिद्ध आहेत.
a) भूषण
b) विजय
c) खाफिखान
d) असदखान

31. 12 जानेवारी, 1708 रोजी शाहूने स्वतःचा राज्याभिषेक करून _____ ही राजधानी निश्चित केली.
a) कोल्हापूर
b) पुणे
c) सातारा
d) सांगली

32. 25 ऑक्टोबर 1802 रोजी _____ यांनी इंग्रजांकडे आश्रय घेतला आणि त्यांच्याशी 'वसईचा तह' केला.
a) नानासाहेब पेशवे
b) यशवंतराव होळकर
c) रघुनाथराव पेशवे
d) दुसरा बाजीराव

33. पूर्वपुराणाश्मयुगाचे अवशेष जेथे सापडले ते सेआनचे खोरे आता _____ मध्ये आहे.
a) अफगाणिस्तान
b) म्यानमार
c) पाकिस्तान
d) भारत

34. उत्तर वैदिक कालखंडात _____ हा सर्वश्रेष्ठ देव होता.
a) वरूण
b) इंद्र
c) वायुदेवता
d) प्रजापती

35. वैदिक कालखंडातील _____ हे प्रसिद्ध युद्ध पारूष्णी नदीच्या काठी झाले.
a) दशराज्ञ
b) पंचराज्ञ
c) सहस्त्रराज्ञ
d) यापैकी नाही

36. _____ हिने मुघलांच्या सेनेविरूद्ध लढा देऊन अहमदनगरच्या किल्ल्याचे रक्षण केले.
a) रोशन आरा बेगम
b) शाहबेगम
c) चांदबिबी
d) राणी दुर्गावती

37. आंध्र राज्यातील _____ राजवटीत रुद्रम्मादेवी आणि इतर मंत्रिपदावरील स्त्रियांचा राजकारणात मोठा सहभाग आहे.
a) चोळ
b) काकतीय
c) विजयनगर
d) पल्लव

38. _____ साली बाबर आणि राणासंग यांच्यात खानवा (सिक्री) येथे महत्त्वपूर्ण लढाई झाली
a) 1547
b) 1647
c) 1627
d) 1527

39. बखरकारांनी _____ लढाईचे वर्णन 'राक्षस तागडीची लढाई' असे केले आहे.
a) पानिपतच्या
b) खानव्याच्या
c) तालिकोटच्या
d) उदगीरच्या

40. _____ कालखंडास प्राचीन भारताचे सुवर्णयुग म्हणून ओळखले जाते.
a) मौर्य
b) वैदिक
c) गुप्त
d) मौर्योत्तर

वैकल्पिक राज्यशास्त्र (संयुक्त) (गुण : 40)

1. भारतात 1953 साली भाषावार पुनर्रचना आयोग कोणाच्या अध्यक्षतेखाली नेमण्यात आला?
a) फाजल अली
b) यशवंतराव चव्हाण
c) सरदार पण्णीकर
d) अशोक मेहता

2. भारतात कोणते राज्य (भाषिक तत्त्वावर) सर्वप्रथम अस्तित्वात आले?
a) कर्नाटक
b) आंध्रप्रदेश
c) तामिळनाडू
d) महाराष्ट्र

3. ऑगस्ट 1905 मध्ये स्वदेशी चळवळ कोणत्या कारणासाठी सुरू झाली?
a) चाफेकर बंधूंच्या फाशीचा निषेध
b) बंगालच्या फाळणीस विरोध
c) इल्बर्ट बिलास विरोध
d) वरील सर्व

4. लोकमान्य टिळकांनी पुरस्कृत केलेल्या चतुःसूत्रीमध्ये प्रामुख्याने स्वराज, राष्ट्रीय शिक्षण, स्वदेशी आणि _____ या चार बाबींचा समावेश होतो.
a) बहिष्कार
b) सत्याग्रह
c) कायदेभंग
d) असहकार

5. मवाळ नेत्यांमध्ये कोणाचा समावेश उचित ठरणार नाही?
   a) व्योमेशचंद्र बॅनर्जी
   b) आनंदमोहन बोस
   c) के. टी. तेलंग
   d) अरविंद घोष

6. 21 ऑक्टोबर 1943 रोजी सुभाषचंद्र बोस यांनी ____ देशात आझाद हिंद सेनेचे हंगामी सरकार स्थापन केले.
   a) जर्मनी b) फ्रान्स
   c) जपान d) सिंगापूर

7. सामाजिक करार सिद्धांतानुसार राज्य ही -
   a) सामाजिक संस्था आहे.
   b) मानवनिर्मित संस्था आहे.
   c) मानवाच्या हितासाठी निर्माण झालेली संस्था आहे.
   d) वरील सर्व

8. लॉकचे मानवी स्वभावविषयक विचारांमध्ये कोणते वाक्य बरोबर नाही?
   a) माणसे मुळातच चांगली असतात.
   b) माणसाला मुळातच बरेच ज्ञान अवगत असते.
   c) अनुभव हाच ज्ञानाचा आधार असतो.
   d) वरील सर्व

9. कोणत्या विचारवंताने सामूहिक ईहा (General Will) ही आधुनिक राज्यशास्त्राला दिलेली एक महत्वाची देणगी मानली गेली आहे?
   a) रूसो b) मार्क्स
   c) गांधी d) लेनिन

10. उपयुक्ततावाद विषयक कोणते विधान चुकीचे आहे?
   a) सुखाचा संख्यात्मक विचार.
   b) व्यक्तीचे हित साधले की समाजाचे हित आपोआप होईल.
   c) प्रत्येक गोष्टीचा उपयुक्ततेवर स्वीकार.
   d) समता महत्वाची.

11. जॉन स्टुअर्ट मिल अनुसार कृतीचे भाग -
   a) व्यक्तीगत कृती
   b) सामाजिक कृती
   c) दोन्ही बरोबर
   d) तीन भाग पडतात.

12. मार्क्सच्या मते वर्ग निर्धारणाचे प्रमुख दोन आधार असतात, ते -
   1) वस्तुनिष्ठ आधार
   2) व्यक्तीनिष्ठ आधार
   3) राज्यनिष्ठ आधार
   a) 1 व 3 बरोबर b) फक्त 1 बरोबर
   c) 1 व 2 बरोबर d) फक्त 3 बरोबर

13. कोणत्या विचारवंताच्या मते उत्पादन प्रणाली म्हणजेच आर्थिक संरचना समाजाची आधारशिला असते?
   a) हेगेल
   b) रूसो
   c) मार्क्स
   d) मॅकिआव्हेली

14. मॅकिआव्हेलीने मनुष्य स्वभावावरील विचारांचे परीक्षण करताना कोणते विधान नाकारले?
   a) मनुष्य हा सदसद्विवेकबुद्धीने वागतो.
   b) मनुष्यावर अविश्वास.
   c) व्यापक दृष्टीचा अभाव.
   d) यापैकी नाही

15. पारंपारिक दृष्टिकोनाचा अभ्यास करताना कोणत्या पद्धतींचा उपयोग केला जातो.
   a) तत्त्वज्ञानात्मक b) ऐतिहासिक
   c) संस्थात्मक d) वरील सर्व

16. खालीलपैकी कोणत्या दृष्टिकोनाच्या, समर्पकता आणि कृती या दोन महत्त्वाच्या मागण्या होत्या?
   a) उत्तरवर्तनवाद
   b) समाजवाद
   c) साम्यवाद
   d) उदारमतवाद

17. कोणत्या व्यक्तीचा उल्लेख समाजवादी विचारवंत म्हणून करता येणार नाही?
   a) जॉर्ज ओवेन
   b) पंडित नेहरू
   c) जॉन लॉक
   d) राम मनोहर लोहिया

18. खालील विधाने विचारात घ्या.
   1) फॅसिस्ट हे बुद्धीपेक्षा भावनेला आवाहन करतात.
   2) सर्वसत्तावाद हे फॅसिझमचे एक वैशिष्ट्य मानले जाते.
   a) विधान 1 बरोबर 2 चूक
   b) विधान 1 चूक 2 बरोबर
   c) दोन्ही विधाने बरोबर
   d) दोन्ही विधाने चूक

19. लोकशाहीसमोरील आव्हाने कोणती?
   a) आर्थिक आणि सामाजिक विषमता
   b) प्रादेशिक असमतोल
   c) बेकारी
   d) वरील सर्व

20. खालील विधाने विचारात घ्या.
1) कौटिल्याच्या मते मंत्र्यांची संख्या राज्याच्या क्षमतेवर आधारित असावी.
2) कौटिल्य चंद्रगुप्त नावानेही ओळखला जातो.
a) विधान 1 चूक
b) विधान 2 चूक
c) दोन्ही बरोबर
d) दोन्ही चूक

21. खालीलपैकी कोणते विधान बरोबर आहे?
1) गांधीजींच्या आदर्श राज्याचा केंद्रबिंदू ग्रामस्वराज्य आहे.
2) 'हिंद स्वराज्य,' 'सर्वोदय' इ. प्रमुख ग्रंथ लोकमान्य टिळकांनी लिहिले आहेत.
a) फक्त 1
b) फक्त 2
c) 1 आणि 2
d) दोन्ही नाही

22. भारतात एखाद्या राजकीय पक्षाच्या निर्वाचित सदस्याने पक्षांतर केले आहे किंवा नाही हे ठरविण्याचा अधिकार कोणास आहे?
a) सर्वोच्च न्यायालय
b) लोकसभा सभापती
c) राष्ट्रपती
d) पंतप्रधान

23. उच्च न्यायालयाच्या न्यायाधिशांना शपथ देण्याचे कार्य कोण करते?
a) सरन्यायाधीश
b) राज्यपाल
c) राष्ट्रपती
d) मुख्यमंत्री

24. भारतीय घटना कलम 75 अन्वये मंत्रिमंडळ कोणास जबाबदार असते?
a) लोकसभा
b) राज्यसभा
c) राष्ट्रपती
d) सर्वोच्च न्यायालय

25. घटनेने आपले उगमस्थान कोणास मानलेले आहे?
a) घटनाकारांना
b) भारतीय जनतेला
c) मसुदा समितीच्या अध्यक्षांना
d) यापैकी नाही

26. राष्ट्रपतींना गुन्हेगारांना माफी देण्याचा (क्षमादानाचा) अधिकार कोणत्या कलमानुसार बहाल करण्यात आला आहे?
a) 124 b) 72
c) 324 d) 32

27. घटनेने कोणत्या कलमानुसार जम्मू-काश्मिर राज्यास विशेष दर्जा देण्यात आला आहे?
a) 371 b) 368
c) 370 d) 169

28. घटनेने उर्वरित विषयांवरील शेषाधिकार कोणास बहाल केले आहेत?
a) सर्वोच्च न्यायालय b) संसद
c) राज्यशासन d) उच्च न्यायालय

29. राष्ट्रपतींना कोणत्या पद्धतीने पदच्युत करता येऊ शकते?
a) संसदेच्या साध्या बहुमताने
b) लोकसभेच्या बहुमताने
c) महाभियोगाद्वारे
d) यापैकी नाही

30. मतदानासाठी आवश्यक पात्रता वय 21 वरून 18 वर्षे कोणत्या घटनादुरूस्तीने करण्यात आले?
a) 61 व्या
b) 62 व्या
c) 71 व्या
d) 89 व्या

31. मुक्त आर्थिक स्वातंत्र्य सिद्धांतांचे पुरस्कर्ते म्हणून कोणाची ओळख आहे?
a) ॲडम स्मिथ
b) मार्क्स
c) लेनिन
d) माओ

32. कोणत्या विचारवंताच्या सामाजिक करार सिद्धांतात दोन करार आहेत?
a) हॉब्ज b) लॉक
c) मार्क्स d) हेगेल

33. ग्रीक राजकीय विचारांची वैशिष्ट्ये कोणती आहेत?
1) धर्मनिरपेक्षवाद
2) राज्य एक नैतिक संस्था
3) गुलामांना नागरिकत्व
a) 1व 3 बरोबर b) 2 व 3 बरोबर
c) सर्व बरोबर d) 1 व 2 बरोबर

34. ग्रामसभेत कोणाचा समावेश होतो?
a) प्रौढ स्त्रिया
b) प्रौढ पुरूष
c) ग्रामपंचायत सदस्य
d) गावातील 18 वर्षांवरील सर्व नागरिक

35. ग्रामपंचायतीची तपासणी करण्याचे अधिकार कोणाकडे आहेत?
a) तहसिलदार
b) उप जिल्हाधिकारी
c) जिल्हाधिकारी
d) महसूल आयुक्त

36. महाराष्ट्रात पंचायत राज यामध्ये स्त्रियांसाठी किती टक्के जागा राखीव असतात?
a) 27%
b) 30%
c) 33%
d) 50%

37. भारतातील पहिली महानगरपालिका कोणती?
a) मुंबई
b) कलकत्ता
c) मद्रास
d) दिल्ली

38. भारतातील आर्थिक विकेंद्रीकरणाचा जनक म्हणून कोणास ओळखले जाते?
a) लॉर्ड कॅनिंग
b) लॉर्ड मेयो
c) लॉर्ड लॉरेन्स
d) लॉर्ड नॉर्थब्रूक

39. 1917 ची रशियन राज्यक्रांती यशस्वी होण्यासाठी ____ यांच्या साम्यवादी विचारांचे मोलाचे योगदान होते.
a) कार्ल मार्क्स
b) रूसो
c) निहिलिस्त
d) मॅक्झिम गॉर्की

40. योग्य विधान ओळखा.
1) भारताच्या महालेखा परीक्षकाचे वेतन संचित निधीतून दिले जाते.
2) नियंत्रक आणि महालेखा परीक्षक वयाच्या 62 व्या वर्षी सेवानिवृत्त होतात.
a) 1 बरोबर, 2 चूक
b) 1 चूक, 2 बरोबर
c) दोन्ही चूक
d) दोन्ही बरोबर

वैकल्पिक लोकप्रशासन (संयुक्त) (गुण : 40)

1. आधुनिक कालखंडात कोणाच्या निबंधापासून लोकप्रशासन या विषयाच्या अभ्यासाला सुरूवात झाली?
a) मॅक्स वेबर
b) टिन मार्टिन
c) हर्बर्ट सायमन
d) वुड्रो विल्सन

2. POSDCORB ही संकल्पना कोणत्या विषयाची आहे?
a) लोकप्रशासन
b) राज्यशास्त्र
c) पर्यावरणशास्त्र
d) वरीलपैकी नाही

3. पहिल्या मिनोब्रुक परिषदेनंतर दुसरी मिनोब्रुक परिषद कधी झाली?
a) 1968
b) 1988
c) 1920
d) 2000

4. 3 Es ही संकल्पना कोणाची?
a) रसेर नॉम
b) अवस्ती व माहेश्वरी
c) आर. ए. डब्ल्यू. होड्स
d) एल्. जी. प्रधान

5. म्युलिक व उर्बिक यांची प्रशानाची तत्त्वे कोणती?
a) 3 Es
b) क्ष व य सिद्धांत
c) शॉप मॅनेजमेंट
d) POSDCORB

6. आदर्श प्रकारच्या नोकरशाहीची कल्पना कोणी मांडली आहे?
a) फॉलेट
b) मॅक्स वेबर
c) सेंट सायमन
d) कार्ल मार्क्स

7. मेरी पॉर्कर फॉलेट यांना कोणती उपाधी दिली जाते?
a) लोकप्रशासनाची निर्मिती
b) व्यवस्थापनातील भाग्यविधाती
c) व्यवस्थापनाची माता
d) यापैकी नाही

8. क्ष आणि य सिद्धांताचे जनक कोण?
a) मॅकग्रेगर
b) एल्टन मेयो
c) सेंट सायमन
d) चाणक्य

9. निर्णयग्रहणविषयक सिद्धांत कोणाचा?
a) जॉर्ज टेरी
b) ॲलन
c) हर्बर्ट सायमन
d) चेस्टर

10. अब्राहम मॉस्लोचा सिद्धांत कोणता?
    a) प्रवृत्त विधानाचा सिद्धांत
    b) नेतृत्वाचा सिद्धांत
    c) निर्णयप्रक्रियेचा सिद्धांत
    d) अभिप्रेरणा सिद्धांत

11. मॅस्लोच्या गरजांच्या वर्गीकरणात सगळ्यात शेवटची गरज कोणती?
    a) शारीरिक गरज
    b) स्वीकारतात्मक गरज
    c) सामाजिक गरज
    d) सुरक्षाविषयक गरज

12. मॅस्लोच्या गरजांच्या वर्गीकरणात सगळ्यात पहिली गरज कोणती?
    a) शारीरिक गरज b) स्वीकारतात्मक गरज
    c) सामाजिक गरज d) सुरक्षाविषयक गरज

13. कोणत्याही प्रशासनाच्या यशस्वितेची पूर्वअट म्हणजे _____ होय.
    a) सरकार
    b) लोकशाही
    c) संघटन
    d) नोकरशाही

14. भारताने नवीन आर्थिक धोरण कधी स्वीकारले?
    a) 2011
    b) 2001
    c) 1998
    d) 1991

15. स्वतंत्र नियामक आयोग ही कोणत्या देशाची वैशिष्ट्यपूर्ण देणगी आहे?
    a) इंग्लंड b) अमेरिका
    c) फ्रान्स d) जपान

16. पनामा रेल्वे कंपनी कोणत्या देशाच्या मालकीची होती?
    a) अमेरिका
    b) इंग्लंड
    c) जपान
    d) स्पेन

17. अर्थसंकल्प कोण मांडतो?
    a) पंतप्रधान
    b) योजना आयोगाचे उपाध्यक्ष
    c) अर्थमंत्री
    d) राष्ट्रपती

18. अविश्वासाचा ठराव कोठे मांडला जातो?
    a) जनता
    b) न्यायमंडळ
    c) यापैकी नाही
    d) कायदेमंडळ

19. अर्थसंकल्पीय पद्धतीद्वारे कायदेमंडळ कोणावर नियंत्रण ठेवते?
    a) ग्रामसभा
    b) प्रशासन
    c) पंचायत
    d) न्यायव्यवस्था

20. लेखा परीक्षणाच्या अहवालावर कोठे चर्चा होते?
    a) कायदेमंडळ
    b) न्यायमंडळ
    c) प्रशासन
    d) ग्रामसभा

21. भारतीय घटनेच्या सुलभीकरणासाठी कोणते कलम राज्य-केंद्र सरकारने कामे विभागलेली आहेत.
    a) 246
    b) 9
    c) 347
    d) 356

22. 'लॉ ऑफ कॉन्स्टिट्यूशन' हा ग्रंथ कोणी लिहिला?
    a) क्वीव एलिझाबेथ
    b) मेकॉले
    c) डायसी
    d) ग्रॅण्टील ऑस्टिन

23. सामान्य नागरिक आणि प्रशासकीय अधिकारी यांच्यातील तंटा सोडवणारी न्यायालय म्हणजे?
    a) ग्राम न्यायालय
    b) खाप पंचायत
    c) सेशन कोर्ट
    d) प्रशासकीय न्यायालय

24. 'प्रदत्त विधान' कोण निर्माण करते?
    a) कार्यकारी मंडळ
    b) न्यायमंडळ
    c) विधिमंडळ
    d) यापैकी नाही

25. अमेरिकेत प्रांतीय स्तरावर गव्हर्नरची निवड कोण करते?
a) उपराष्ट्रपती
b) सिनेट
c) जनता
d) राष्ट्रपती

26. भारतात प्रांतीय स्तरावर गव्हर्नरची नेमणूक कोण करते?
a) जनता
b) सर्वोच्च न्यायालयाचे अध्यक्ष
c) पंतप्रधान
d) राष्ट्रपती

27. भारतात मंत्रिमंडळ सामूहिकरीत्या कोणाला जबाबदार असते?
a) सर्वोच्च न्यायालय
b) कायदेमंडळ
c) जनता
d) यापैकी नाही

28. प्रशासकीय पर्यावरण दृष्टीकोन यातील पर्यावरण हा शब्द कोणत्या शास्त्रातून घेतला आहे?
a) जीवशास्त्र
b) रसायनशास्त्र
c) भौतिकशास्त्र
d) अणुविज्ञानशास्त्र

29. 1994 साली महाराष्ट्र शासनाने कोणते धोरण निश्चित केले?
a) सत्तांतरण
b) राजकोषीय
c) महिला धोरण
d) नदीजोड

30. सनदी सेवकांचे प्रशासनातील कोणते काम करत नाही?
a) प्रशासकीय न्याय
b) सल्ला देणे
c) कायद्याची अंमलबजावणी
d) निवडणुकीस उभा रहाणे

31. स्पॉईल सिस्टिम ही कोणत्या राष्ट्राची वैशिष्ट्यपूर्ण पद्धत होती?
a) भारत
b) अमेरिका
c) पाकिस्तान
d) रशिया

32. योग्यता पद्धत (मेरिट सिस्टिम) ही सगळ्यात पहिल्यांदा कोठे आढळून येते?
a) चीन
b) भारत
c) सुमारिया
d) मेसोपेटोमिया

33. सनदी सेवेचे वैशिष्ट्यपूर्ण लक्षण कोणते?
a) निःपक्षपातीपणा
b) पक्षपातीपणा
c) a व b दोन्ही
d) यापैकी नाही

34. आय् ए एस् हे पद कोणत्या पद्धतीद्वारे भरले जाते?
a) MPSC
b) SSC
c) UPSC
d) सरळ सेवा भरती

35. महाराष्ट्र लोकसेवा आयोग राज्यघटनेच्या कोणत्या कलमांद्वारे स्थापन केलेला आहे?
a) 315
b) 1
c) 409
d) 380

36. वैकुंठलाल मेहता सहकारी व्यवस्थापन राष्ट्रीय संस्था कोठे आहे?
a) गडचिरोली
b) बस्तार
c) पुणे
d) परळी

37. सार्वजनिक धोरण कोण तयार करते?
a) न्यायमंडळ
b) जनता
c) एन् जी ओ
d) सरकार

38. शून्याधारित अर्थसंकल्प सगळ्यात अगोदर कोणत्या देशात मांडला गेला?
a) बांगलादेश
b) अमेरिका
c) पेरू
d) हैती

39. बजेट या शब्दाची व्युत्पती कोणत्या भाषेपासून झाली?
a) फ्रेंच
b) स्पेन
c) संस्कृत
d) रशियन

40. अर्थसंकल्प तयार करण्याची जबाबदारी कोणाची?
a) कॅबिनेट
b) महिला व बालकल्याण मंत्रालय
c) वित्त मंत्रालय
d) गृहमंत्रालय

वैकल्पिक भूगोल (संयुक्त) (गुण : 40)

1. भूकंपामुळे स्थानिक प्रदेशात एकाएकी खच पडून खड्डे तयार होतात. कालांतराने त्यामध्ये पाणी साचून ____ निर्मिती होते.
   a) नदी b) समुद्र
   c) सरोवर d) ओढा

2. पृथ्वीचे अंतरंग स्वरूप कशा प्रकारचे आहे हे कोणत्या क्रियेमुळे समजण्यास मदत होते?
   a) ज्वालामुखी b) पूर
   c) वादळ d) त्सुनामी

3. सूर्यापासून फेकल्या जाणाऱ्या सौरशक्तीपैकी 35% सौरशक्ती परावर्तित होते. याला ____ असे म्हणतात.
   a) भू-धवलता b) धवलता
   c) परिवर्तनीयता d) अपस्करण

4. जेट प्रवाहाची साधारण दिशा ____ असते.
   a) पूर्वेकडून पश्चिमेकडे b) पश्चिमेकडून पूर्वेकडे
   c) दक्षिणेकडून उत्तरेकडे d) यापैकी नाही

5. पृथ्वीच्या अंतरंगात जी शक्ती सक्रिय असते, तिच्या परिणामाला ____ म्हणतात.
   a) आकस्मिक
   b) बाह्यशक्ती
   c) निर्माणकारी
   d) आंतरिक प्रक्रिया

6. नदीच्या संचयन कार्यामुळे कोणते भूरूप तयार होते?
   a) दरी
   b) हिमोढ
   c) केम्स
   d) त्रिभुज प्रदेश

7. मंद गतीने कार्यरत असणारी पृथ्वीची शक्ती कोणती आहे?
   a) भूप्रक्षोभ
   b) भूकंप
   c) ज्वालामुखी
   d) पूर

8. भूखंड उताराचा उतार (स्लोप) साधारण किती असतो?
   a) 15° - 20° b) 2° - 6°
   c) 25° - 30° d) 40°

9. जेटप्रवाहाचा आकार कसा असतो?
   a) सरळ b) गोलाकार
   c) नदीसारखे नागमोडी d) काटकोनात

10. वाऱ्याच्या खनन कार्यामुळे कोणते भूरूप तयार होते?
    a) वातघृष्ट
    b) हिमानी सरोवर
    c) भू-हिमोद
    d) हिमोढगिरी

11. लोकसंख्या व संसाधने यातील सहसंबंध सुसूत्रतेने मांडण्याचा पहिला प्रयोग ____ याने केला.
    a) थॉमस माल्थस
    b) वॉन ह्यूनेन
    c) कार्ल मार्क्स
    d) अल्फ्रेड वेबर

12. वातावरणाच्या थरांचा चढता क्रम ____ प्रमाणे आहे.
    1) स्थितांबर 2) तपांबर
    3) मध्यांबर 4) बाह्यांबर
    a) 2, 1, 3, 4 b) 1, 2, 3, 4
    c) 3, 4, 2, 1 d) 4, 3, 2, 1

13. समुद्री प्रवाहांवर परिणाम करणारे घटक कोणते?
    a) तापमान
    b) क्षारता
    c) गुरूत्व
    d) सर्व

14. महासागराची क्षारता कोणत्या घटकामुळे वाढते?
    a) पर्जन्य
    b) नदीचा पाणी पुरवठा
    c) समुद्री प्रवाह
    d) अधिक बाष्पीभवन

15. स्थानिक हवामान स्थिती कोणत्या आहेत?
    a) वादळ b) चक्रीवादळ
    c) हरिकेन d) वरील सर्व

16. उन्हाळी मोसमी वारे कुठे तयार होत नाहीत?
    a) युरोप
    b) भारतीय उपखंड
    c) चीन
    d) आग्नेय आशिया

17. खालीलपैकी कोणते ग्रहीय वारे आहे?
    a) पूर्वीय (व्यापारी) वारे b) पश्चिमी (प्रतिव्यापारी) वारे
    c) ध्रुवीय वारे d) वरीलपैकी सर्व

18. बाह्यशक्तीचे कोणते कार्य नाही?
a) अपक्षय
b) क्षारण
c) उत्खनन
d) निःक्षेपण

19. हिमनदीच्या संचयनामुळे कोणते भू-रूप तयार होते?
a) कुंडल
b) हिमोढ
c) पुसट
d) घळई

20. खालीलपैकी कोणती मृदा जास्त पाणी साठवून ठेवते?
a) पांढरी
b) तांबडी
c) काळी
d) जांभळी

21. खालीलपैकी कोणते आधुनिक नगर आहे?
a) पुणे
b) दिल्ली
c) कोलकाता
d) चंदीगढ

22. खालीलपैकी कोणते शहर हे शैक्षणिक शहर आहे?
a) कोटा
b) दिल्ली
c) मुंबई
d) कांडला

23. भारतातून कुशल कामगांराचे स्थलांतर कोणत्या देशात झाले आहे?
a) पाकिस्तान
b) नेपाळ
c) अमेरिका
d) श्रीलंका

24. भारतात वेगाने व वाढणारे शहर कोणते?
a) गुरगाव b) नागपूर
c) पुणे d) बंगळूरू

25. भारतात कोणत्या घटकाचे लिंग गुणोत्तर सर्वांत कमी आहे?
a) ग्रामीण लोकसंख्या b) आदिवासी
c) शहरी लोकसंख्या d) वनवासी

26. भारताची लोकसंख्या कोणत्या वर्षी सर्वांत जास्त असेल?
a) 2020
b) 2030
c) 2045
d) 2025

27. भारतातून परराष्ट्रात होणाऱ्या नागरिकांच्या स्थलांतराचे कोणते कारण नाही?
a) शिक्षणसंधी
b) रोजगार
c) असहिष्णुता, अशांतता
d) व्यवसाय

28. हिमनदीचे मुख्यतः _____ प्रकारचे कार्य चालते.
a) खनन
b) वहन
c) संचयन
d) सर्व

29. हिंदी महासागराच्या संबंधित समुद्र कोणते आहेत?
a) तांबडा समुद्र
b) अरबी समुद्र
c) a आणि b
d) बाल्टिक समुद्र

30. सुएझ कॅनॉल कोणत्या दोन समुद्रांना जोडतो?
a) भूमध्य समुद्र - तांबडा समुद्र
b) भूमध्य समुद्र - अरबी समुद्र
c) भूमध्य समुद्र - चिनी समुद्र
d) अरबी समुद्र - तांबडा समुद्र

31. ओझोन स्तर वातावरणातील कोणत्या थरात असतो?
a) बाह्यांबर
b) दलांबर
c) स्थितांबर
d) तपांबर

32. हवेच्या सर्वात खालच्या स्तरात कोणता वायू असतो?.
a) ऑक्सिजन b) झेनॉन
c) हायड्रोजन d) नायट्रोजन

33. खालीलपैकी कोणता प्रमुख भूपट्ट नाही?
a) युरेशिया b) आफ्रिका
c) उत्तर अमेरिका d) हिंदी महासागर

34. सागरीय कवच असलेल्या भूपट्टांची टक्कर भूखंड भूपट्टाशी होते, याला _____ म्हणतात.
a) पट्टाघात
b) पट्टाटक्कर
c) महासागर भूखंड आघात
d) महासागर-महासागर भूपट्टे

35. क्षारण करण्यास कोणते घटक जबाबदार असतात?
a) नदी
b) हिमनदी
c) सागरलाटा
d) सर्व

36. शीघ्र गतीने कार्यरत असणारी पृथ्वीची शक्ती कोणती?
a) भूकंप b) ज्वालामुखी
c) a आणि b d) दाब

37. पृथ्वीच्या गाभ्यात कोणती दोन मूलद्रव्ये असतात?
a) निकेल, कोबाल्ट b) निकेल, झिंक
c) निकेल, लोखंड (फेरस) d) तांबे, जस्त

38. शिलावरणाचे _____ व _____ असे दोन थर असतात.
a) सियाल, सीमा b) सिल, नीफे
c) सियाल, गाभा d) सियाल, शिलावरण

39. शुद्ध पाणी खडकात झिरपल्यानंतर कोणत्या खनिजांची घनता वाढते.
a) लोह b) फेल्स्पार
c) तांबे d) जस्त

40. भारतातील लोकांचा प्रमुख व्यवसाय कोणता आहे?
a) हातमाग
b) शेती
c) रेल्वे
d) नोकरी

वैकल्पिक समाजशास्त्र (संयुक्त) (गुण : 40)

1. 'शेतकऱ्यांचा आसूड' हे पुस्तक कोणी लिहिले?
a) शाहू महाराज b) महात्मा फुले
c) डॉ. आंबेडकर d) यापैकी नाही

2. अरूंता जमात कोठे आढळते?
a) चीन b) आशिया
c) आफ्रिका d) ऑस्ट्रेलिया

3. द्विजा वर्ण म्हणजे _____ होय.
a) ब्राह्मण b) क्षत्रीय
c) वैश्य d) सर्व

4. समाज हा कशाचा समूह आहे.
a) संस्थांचा b) व्यक्तींचा
c) धर्मांचा d) यापैकी नाही

5. प्रतिलोम विवाह म्हणजे _____ यांचे लग्न होय.
a) वरिष्ठ जातीतील वर व जातीतील वधू
b) वरिष्ठ जातीतील वधू व कनिष्ठ जातीतील वर
c) आंतरधर्मीय
d) यापैकी नाही

6. गोत्र हा कशाचा उपघटक आहे?
a) जातीचा
b) वर्णाचा
c) पिंडाचा
d) यापैकी नाही

7. मेहेर म्हणजे काय?
a) हुंडा
b) मुस्लिम वधूस दिलेली रक्कम
c) नुकसानभरपाई
d) पोटगी

8. भारतात मुस्लिमांना कायदा लागू होतो?
a) स्पेशल मॅरेज ॲक्ट b) शरियत कायदा
c) सुन्नी कायदा d) शिया कायदा

9. आनंद विवाह कायदा कोणत्या धर्मियांसाठी आहे?
a) हिंदू b) जैन
c) मुस्लिम d) शीख

10. वधूस अंमली पदार्थ देऊन केलेले लग्न म्हणजे _____ विवाह होय?
a) राक्षस b) असूर
c) प्राजपत्य d) पिसाच्छ

11. अर्श विवाहामध्ये _____ ची भेट दिली जाते.
a) पैसे
b) सोने
c) बैल किंवा गाय
d) जमीन

12. मुस्लिम विवाहामध्ये 'खुला' म्हणजे काय?
a) तलाक b) कैदेतून सुटका
c) स्वंतत्र होण्याची परवानगी d) यापैकी नाही

13. बहुपत्नी पद्धत _____ धर्मियांमध्ये मंजूर आहे.
a) हिंदू
b) मुस्लिम
c) शीख
d) जैन

14. सहकाराचे तत्त्व कोठे समाविष्ट नाही?
a) यूएन्ओ
b) सहकारी संस्था
c) कुटुंब
d) विरोधी चळवळ

15. प्रत्यक्ष सहकार कोठे अस्तित्वात असतो?
a) शासन b) संसद
c) कुटुंब d) नोकरशाही

16. 'स्व आणि ओळख' ही संकल्पना कोणी स्पष्ट केली?
a) मीड
b) मार्क्स
c) डुरखिम
d) मॅक्स वेबर

17. आत्महत्येचा अभ्यास कोणी केला?
a) इमाईल डुरखिम b) मीड
c) मॅक्स वेबर d) पॅरेटो

18. एलिट क्लास थिअरी कोणी मांडली?
a) रूसो
b) व्हॉल्टेअर
c) पॅरेटो
d) मार्क्स

19. सामाजिक उत्क्रांतीचा सिद्धांत कोणी मांडला?
a) हर्बर्ट स्पेन्सर b) इमाईल डुरखिम
c) डार्विन d) यापैकी नाही

20. 'सती' ही कोणत्या प्रकारची आत्महत्या मानता येईल?
a) इगोइस्टिक
b) अनॉमिक
c) अल्ट्रुएस्टिक
d) क्राससिस

21. 'द कम्युनिस्ट मॅनिफेस्टो' कधी प्रकाशित झाले?
a) 1748 b) 1848
c) 1948 d) 1779

22. सामाजिकीकरणामुळे माणूस _____ चा सदस्य बनतो.
a) कुटुंब
b) समाज
c) देश
d) समुदाय

23. डॉक्टर-पेशंट हे _____ नाते आहे.
a) जुळे
b) ध्रुवीय
c) भागीदारी
d) व्यावहारिक

24. संदर्भ गटाचे अवलोकन म्हणजेच _____ होय.
a) आधुनिकीकरण b) पाश्चिमात्यीकरण
c) सांस्कृतिकीकरण d) यापैकी नाही

25. 'आम्ही व ते' ही भावना कोठे असते?
a) अंतस्थ व बाह्यगट b) धर्म
c) देश d) यापैकी नाही

26. प्राचीन भारतातील विमानांचे संदर्भ, या _____ आहेत. ?
a) कल्पना
b) विज्ञांनाचे शोध
c) दैवी शक्ती
d) यापैकी नाही

27. कार्ल मार्क्सच्या मते _____ हे संस्कृतीचे पायाभूत घटक असतात.
a) उत्पादन प्रकार
b) धर्म
c) जाती
d) राजकारण

28. इंग्लंडमधील आधुनिक शिक्षणामुळे _____ चा विकास झाला.
a) व्यक्तिस्वातंत्र्य
b) राष्ट्रवाद
c) आधुनिक विचार
d) वरीलपैकी सर्व

29. नमस्कार करणे हा/ही _____ आहे.
a) सवय
b) सांस्कृतिक सद्गुण
c) सांस्कृतिक दुर्गुण
d) यापैकी नाही

30. जस्टिन पार्टीची स्थापना कोणी केली?
a) इ. व्ही. रामस्वामी नायकर
b) जयललिता
c) कुमारस्वामी
d) सी. एन्. रेड्डी

31. SNDP चळवळ कोणी सुरू केली?
a) श्री. नारायण गुरू
b) बाबासाहेब आंबेडकर
c) महात्मा फुले
d) शाहू महाराज

32. 'वुमेन्स इंडिया असोसिएशन'ची स्थापना कोणी केली?
a) रमाबाई रानडे b) भांडारकर
c) महात्मा फुले d) मार्गारिट कझिन

33. नायर चळवळ कोणत्या राज्यात झाली?
a) महाराष्ट्र b) तमिळनाडू
c) केरळ d) कर्नाटक

34. चंपारण्य सत्याग्रह कधी झाला?
a) 1917
b) 1918
c) 1919
d) 1920

35. मलबारच्या किनारपट्टीवर 1921 साली कोणी बंड केले.
a) नायर b) शेनार
c) मोपला d) यापैकी नाही

36. दख्खनचे दंगे कोणी घडवून आणले?
a) सैन्य b) शेतकरी
c) संन्यासी d) क्रांतिकारक

37. 'यंग बंगाल मूव्हमेंट' कोणी सूरू केली?
a) राजा राममोहन रॉय b) हेन्री व्हिव्हियन डेरोझिओ
c) स्वामी दयानंद सरस्वती d) ॲनी बेझंट

38. प्रार्थना समाज कोणत्या प्रांतात कार्यरत होता?
a) बंगाल b) बॉम्बे
c) मध्य d) उत्तर

39. एम्. एन्. रॉय यांनी ____ पक्षाची स्थापना केली.
a) कम्युनिस्ट b) जनसंघ
c) मुस्लिम लीग d) हिंदू महासभा

40. ब्राह्मो समाजाची स्थापना कधी झाली?
a) 1819
b) 1929
c) 1929
d) 1827

वैकल्पिक मराठी (संयुक्त) (गुण : 40)

1. पुढीलपैकी एका प्रश्नाचे उत्तर 300 शब्दांत लिहा. 20

a) ''नामदेवांचे कार्य'' या विषयावर निबंध लिहा.

b) प्रत्येक शाहीरांची तीन वाङ्मयीन वैशिष्ट्ये सांगा.

2. खालीलपैकी दोन प्रश्नांची उत्तर 250 शब्दांत लिहा. 20

a) श्रीधरांच्या लोकप्रियतेची कारणे कोणती? सोदाहरण लिहा.

b) सभासद बखर यावर सविस्तर चर्चा करून सोदाहरण स्पष्ट करा.

c) लोककथांचे वर्गीकरण कसे केले जाते, ते सांगून प्रमुख लोककथा प्रकारांची वैशिष्ट्ये सांगा.